Healer Of The Poor

# गरिबांचा आरोग्यदूत

## १९८९च्या सुमारास पालघर खानापाडा येथे पहिला होमिओपॅथिक दवाखाना सुरू करण्यात आला.

Written by **लोकसत्ता टीम**



---

मुंबईच्या वेशीवर असूनही पालघर हा वंचितांच्या पंगतीतला जिल्हा. आदिवासीबहुल पालघरमधल्या रुग्णांची कुचंबणा लक्षात घेऊन दोन दशकांपूर्वी डॉ. एम. एल. ढवळे मेमोरियल ट्रस्टने सुसज्ज रुग्णालय उभे केले. रुग्णसेवा, शिक्षण आणि संशोधन या त्रिसूत्रीचा अवलंब करत जिल्ह्यात आरोग्यसेवेचे जाळे विणलेली ही संस्था गरीब, आदिवासींसाठी आरोग्यदूत ठरली आहे.

पालघर हा आदिवासीबहुल जिल्हा. मुंबईपासून अवघ्या १०० किलोमीटर अंतरावर असूनही हा जिल्हा कमालीचा मागासलेला. जिल्हा म्हणून तो सात वर्षांपूर्वी नकाशावर झळकला. पण,

आधीच्या ठाणे जिल्ह्यात असतानाही मूलभूत सुविधांची कमतरता असलेल्या पालघरमध्ये कुपोषण, रक्तक्षयासह अन्य आजारांचे प्रमाण लक्षणीय. मोठ्या प्रमाणात घरातच प्रसूती करण्याचा प्रघात. त्यामुळे माता-बालक आरोग्याकडे प्रचंड दुर्लक्ष आणि बालमृत्यू व कुपोषणाची समस्या अगदीच गंभीर. वर्षानुवर्षांचे हे चित्र काही प्रमाणात तरी बदलण्यात डॉ. एम. एल. ढवळे मेमोरियल ट्रस्टचे मोठे योगदान आहे.

गेल्या २१ वर्षांत ट्रस्टने या मागास भागात आरोग्यसेवेचे जाळे निर्माण केले. 'होमिओपॅथी'सारख्या कमी खर्चाच्या औषध उपचार पद्धतीने आणि त्याच्या जोडीला ॲलोपॅथिक डॉक्टर- सर्जन यांच्यासह सर्व प्रकारच्या एकात्मिक वैद्यकीय सेवा सध्या ढवळे ट्रस्ट पुरवत आहे.  प्रत्येक रुग्णाला दर्जेदार सेवा देण्याच्या ध्येयाने संस्था कार्यरत आहे.

डॉ. एम. एल. ढवळे यांचे १९८९ मध्ये निधन झाल्यानंतर त्यांच्या नावाने सेवाभावी संस्थेची उभारणी करण्यात आली. त्यांचे वडील प्राध्यापक डॉ. एल. डी. ढवळे हे जे. जे. वैद्यकीय महाविद्यालयात मेडिसिन व पॅथॉलॉजी या विषयाचे अध्यापन करत असताना १९३० च्या सुमारास त्यांनी होमिओपॅथीचा सखोल अभ्यास केला. पुढे त्यांनी होमिओपॅथीसाठी स्वत:ला वाहून घेतले. ते देशातील पहिल्या फळीतील होमिओपॅथी डॉक्टर होते. तसेच राज्यातील होमिओपॅथिक अभ्यासक्रम समितीचे ते सदस्यही होते. त्यांचे चिरंजीव डॉ. एम.एल. ढवळे यांनी वडिलांचा वारसा सुरू ठेवला. स्वत: एमडी झाल्यानंतर त्यांनी लंडन येथे जाऊन होमिओपॅथीचे शिक्षण घेतले. शास्त्रशुद्ध अभ्यास पद्धतीद्वारे होमिओपॅथी क्षेत्र विकसित करताना त्यांनी १९७५च्या सुमारास आयसीआर या संस्थेची उभारणी केली आणि नवीन होमिओपॅथिक उपचार पद्धतीचे संशोधन करून त्याविषयी विपुल लेखन केले. उपचाराच्या दर्जात कोणत्याही परिस्थितीत तडजोड करायची नाही, हे सूत्र त्यांनी आयुष्यभर जपले. कर्नाटकमध्ये एका होमिओपॅथिक रुग्णालयाच्या उभारणीसाठी त्यांनी केलेल्या संकल्पनेवर पालघर येथील ग्रामीण होमिओपॅथिक रुग्णालय उभे आहे. रुग्णसेवा, शिक्षण व संशोधन या त्रिसूत्रीचा समाजापर्यंत आरोग्याचे जाळे पसरवण्याचे काम त्यांच्या अकाली निधनानंतर त्यांचे रुग्ण व विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन केले. त्यांच्या स्मरणार्थ डॉ. एम. एल. ढवळे मेमोरियल ट्रस्ट स्थापन करण्यात आला.

होमिओपॅथी केंद्रस्थानी ठेवून रुग्णसेवा करणे, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यामधील नैपुण्याद्वारे सुदृढ आरोग्यासाठी स्वस्त उपचार विकसित करून आपल्या परिसरातील रुग्णांना साहाय्य करणे हे या संस्थेचे उद्दिष्ट पुढे नेण्यास संस्थेचे दोनशेहून अधिक सर्मिपत व्यावसायिक डॉक्टर एकत्रितपणे प्रयत्न करत आहेत.

१९८९च्या सुमारास पालघर खानापाडा येथे पहिला होमिओपॅथिक दवाखाना सुरू करण्यात आला. मालाड कुरार येथील महावीर रुग्णालय

भाडेतत्त्वावर चालविताना प्रसूती व इतर रुग्णांवर उपचार करण्याच्या अनुभवावर संस्थेने जानेवारी २००० मध्ये पालघरमध्ये साडेतीन एकर भूखंडावर ग्रामीण होमिओपॅथिक रुग्णालय सुरू केले. या रुग्णालयाचा विस्तार टप्प्याटप्प्याने वाढत जाऊन सध्या १०० खाटांचे अद्ययावत रुग्णालय कार्यरत आहे.

या रुग्णालयात सध्या होमिओपॅथिक उपचार पद्धतीत सामान्य, बालरोग, संधिवात, मानसिक आजार, मधुमेह, छातीचे आजार, त्वचारोग, एंडोक्राइनोलॉजी, वंध्यत्व, हृदयरोग, नेफरोलॉजी जीरिएटिक्स, अपघात विभाग कार्यरत आहेत. ॲलोपॅथिक सेवेत स्त्रीरोग, प्रसूती व वंध्यत्व निदान, बालरोग व नवजात शिशू, दंतचिकित्सा, अस्थिशल्य चिकित्सा, नेत्रचिकित्सा, जनरल सर्जरी, जनरल मेडिसिन आणि आपत्कालीन विभाग, अतिदक्षता विभाग, मूत्रपिंडविकार असे विभाग कार्यरत आहेत. रुग्णालयाच्या तपासणी विभागात सुसज्ज प्रयोगशाळा, डिजिटल एक्स-रे, २डी इको, पल्मनरी फंक्शन टेस्ट, स्ट्रेस टेस्ट, पॅथॉलॉजी, रेडिओलॉजी, ऑक्युपेशनल थेरपी, न्यूरो फिजिओ थेरेपी, स्पीच थेरेपी, आहार मार्गदर्शन इत्यादींचा समावेश आहे. रुग्णालयाच्या १३०० चौरस फूट क्षेत्रामध्ये दहा डायलिसिस यंत्राच्या साहाय्याने दररोज २८ ते ३० रुग्णांवर डायलिसिस केले जातात. या सेवेचा पालघर, डहाणू व विक्रमगड तालुक्यांतील रुग्णांना लाभ मिळत आहे. संस्थेच्या ‘कम्युनिटी केअर कमिटी’तर्फे ‘दरिद्रीनारायण निधी’ उभारला जातो आणि  हलाखीची आर्थिक परिस्थिती असलेल्या रुग्णांसाठी तो वापरला जातो. माता-बालक, वृद्ध, अपंग आदींना प्राधान्य देत ही मदत दिली जाते. वर्षाला एक लाखाहून अधिक रुग्णांवर या ठिकाणी उपचार केले जातात.

यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या माध्यमातून २००६ पासून परिचारिका प्रशिक्षण अभ्यासक्रम सुरू असून, दरवर्षी ४० विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाते. गेल्या वर्षापासून ‘ज्येष्ठ नागरिक सेवक’ अभ्यासक्रमाच्या मध्यमातून ज्येष्ठ नागरिकांची शुश्रूषा करण्यासाठी आरोग्य सेवक तयार करण्याचा प्रयत्न सुरू आहे. या रुग्णालयात १४ खाटांचा अनुकंपा विभाग सुरू करून मानसिक आजार असलेल्या रुग्णांना तसेच अंथरुणाला खिळलेल्या ज्येष्ठ नागरिकांना सेवा पुरवली जाते. ऑगस्ट २०२० पासून या रुग्णालयातील ५० खाटा करोना रुग्णांसाठी आरक्षित करण्यात आल्या आहेत.

रुग्णालयात सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया माफक दरामध्ये करण्यात येते. या रुग्णालयामध्ये कार्डियाक रुग्णवाहिकेच्या सुविधा उपलब्ध  असून, लॅप्रोस्कोपिक व मूत्रविकार (युरॉलॉजिकल) शस्त्रक्रियाही करण्यात येतात. पालघर येथील रुग्णालयात ३६ विद्यार्थ्यांसाठी एम.डी. (होमिओपॅथी) हा पदव्युत्तर अभ्यासक्रम २००४ पासून सुरू आहे.

विक्रमगड तालुक्यातील भोपोली परिसरात महिलांमध्ये रक्तक्षय,  तसेच तरुणींमध्ये आरोग्याच्या समस्या मोठ्या प्रमाणावर आढळून आल्या. त्याचे गांभीर्य लक्षात घेऊन समाज आरोग्य प्रकल्पाअंतर्गत संस्थेतर्फे अनेक उपक्रम राबवण्यात येत आहेत. त्यामध्ये

तरुणींना शिक्षण-आरोग्यसेवा, गर्भवती महिलांवर देखरेख- मार्गदर्शन आणि त्यांना पौष्टिक आहाराची जोड, संस्थात्मक प्रसूती करण्याबाबत जागृती व नवजात बालकांची आरोग्य तपासणी तसेच सर्वसाधारण आरोग्याच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन असे अनेक उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. संस्थेच्या 'मोबाइल मेडिकल युनिट'मार्फत परिसरातील २५ किलोमीटर परिघातील २५ गाव-पाड्यांत जाऊन आरोग्य सेवा पोहोचविली जाते. त्याच पद्धतीने कुपोषित बालकांसाठी विशेष मोहीम सुरू असून गाव दत्तक घेणे, रुग्णवाहिका सेवा पुरवून आजारी व्यक्तींना लवकरात लवकर उपचार देण्यासाठी प्रयत्न करणे, आरोग्यविषयी जनजागृती करणे यासाठी चर्चासत्र व शिबिरांचे आयोजन केले जाते. पालघरमधील गरीब रुग्णांना सेवा देण्यास संस्था कटिबद्ध आहे. मात्र, या व्रतस्थ रुग्णसेवेला सहकार्याचे बळ देण्याची आवश्यकता आहे. – **नीरज राऊत**

संस्थेपर्यंत कसे जाल?

डॉ. एम. एल. ढवळे मेमोरियल ट्रस्टचे

पालघरमधील ग्रामीण होमिओपॅथिक रुग्णालय मुंबई- अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरून पश्चिमेला २२ किलोमीटर अंतरावर आहे. पालघर-बोईसर मार्गावर नव्याने उभारण्यात येणाऱ्या जिल्हा मुख्यालयाजवळ हे रुग्णालय आहे.

डॉ. एम. एल. ढवळे मेमोरियल ट्रस्ट Dr. M. L. Dhawale Memorial Trust या नावाने धनादेश काढावा.

धनादेशामागे किंवा त्याबरोबर देणगीदाराने आपले संपूर्ण नाव, पत्ता, दूरध्वनी तसेच भ्रमणध्वनी क्रमांक लिहावा.